महाराष्ट्र शासन


**वरिष्ठ पोलीस निरिक्षक कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई**

**एस.व्ही.रोड. पारेख नगर, कांदिवली (पश्चिम),मुंबई ४०००६७**

**E Mail - kandivalipolicestation@gmail.com**


# :: प्रेस नोट ::

दिनांक :- २९/०८/२०२६

## महानगरगॅस कंपनीच्या नावाने एपीके फाईल पाठवुन त्याव्दारे मोबाईल हॅक करुन बॅंक खात्यातुन पैसे काढणा-या तीन आरोपींना अटक करुन गुन्हयात गेलेली संपुर्ण रक्कम ६,२५,०००/- रुपये जप्त केलेबाबत.

दिनांक ०९/०५/२०२६ रोजी सायंकाळी ०४:०० वा. सुमारास फिर्यादी श्री. बकुल कांतीलाल देसाई यांना अनोळखी इसम मोबाईल धारक ८११४५२४११२ व ७९७०४२१९३७ यांनी फिर्यादी यांना त्यांचे गॅस रिडींग अपलोड करण्याचे बाकी असल्याचे सांगून फिर्यादी यांचे मोबाईलवर एमजीएनएल कंपनीची एपीके फाईल पाठवून ती फिर्यादी यांना डाउनलोड करण्यास सांगून त्याद्वारे फिर्यादी यांचा मोबाईल हॅक करून फिर्यादी यांचे एच डी एफ सी बॅंक, खाते क्र. ०१४५१०००६७७६७ या खात्यातील एकुण २,०७,४०१.००/- इतक्या रक्कमेची ऑनलाईन फसवणुक केली म्हणुन कांदिवली पोलीस ठाणे येथे गुरनं ८७९/२०२६ कलम ३१६(२),३१८(४),३(५) भा.न्या.सं. सह कलम ६६(सी)(डी) प्रमाणे गुन्हा नोंद करणेत आलेला होता.

त्याचप्रमाणे दिनांक ०७/०५/२०२६ रोजी १२.३० रोजी सुमारास फिर्यादी नामे श्री. शैलेश जयकिशन परमार यांना महानगर गॅसचे गॅस रिडींगचे १२ रूपये भरण्यास सांगून फिर्यादी यांचे मोबाईलवर एमजीएनएल कंपनीची एपीके फाईल पाठवून ती फिर्यादी यांना डाउनलोड करण्यास सांगून त्याद्वारे फिर्यादी यांचा मोबाईल हॅक करून त्यांचे एच डी एफ सी बॅंकेचे बचत खात्यातून ४,१७,११७.०० इतक्या रक्कमेची फसवणूक केली म्हणुन कांदिवली पोलीस ठाणे येथे गुरनं १०४७/२०२६ कलम ३१६(२),३१८(४),३(५) भा.न्या.सं. सह कलम ६६(सी)(डी) प्रमाणे गुन्हा नोंद करणेत आलेला होता.

सदरचे दोन्ही गुन्हे कांदिवली पोलीस ठाणेच्या सायबर सेलने तांत्रिक तपास केला असता त्यामध्ये असे दिसुन आले की, यातील आरोपी उर्विशकुमार राजेशभाई पटेल, जनिकुमार प्रदिपभाई पटेल व अंकितकुमार संजयभाई पटेल यांनी बजाज फिनसर्व्ह या वित्तीय कंपनीकडुन गोल्ड लोन घेवुन ते स्वत:चे फायदयासाठी वापरले त्यानंतर फिर्यादी यांचे मोबाईल हॅक करुन त्यांचे खात्यातील पैसे ऑनलाईन बजाज फिनसर्व्ह कंपनीचे सोने तारण कर्जाची परतफेड करुन तारण ठेवलेले सोन्याचे दागिने पुन्हा स्वत:कडे घेतल्याचे निष्पण्ण झाल्याने आरोपीतांना कांदिवली पोलीस ठाण्याच्या पथकाने गाव - ओलपाड, जि. सुरत राज्य - गुजरात येथून ताब्यात घेवुन या दोन्ही गुन्हयामध्ये अटक करणेत आली आहे. आरोपींकडुन गुन्हयात फसवणुक झालेली ६,२४,५१८/- रुपये जप्त करणेत आलेले आहेत.

सदर कारवाई मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. मनोजकुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त (का. व सु.), बृहन्मुंबई, मा. श्री. डॉ. अभिनव देशमुख, अपर पोलीस आयुक्त, (अतिरिक्त कार्यभार) उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. श्री. संदीप घुगे, पोलीस उप आयुक्त, उत्तर परि.- ०२, मुंबई, मा. श्री. संतोष धनवटे, सहाय्यक पोलीस आयुक्त, बोरिवली विभाग, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली श्री. करण सोनकवडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई, श्री. शेखर शिंदे पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. स्वप्निल घोंगडे,(जनसंपर्क) पोलीस निरीक्षक कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई यांचे प्रत्यक्ष देखरेखीखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक दिपक कादबाने, पोलीस उप निरीक्षक रविंद्र चव्हाण, पोउपनिरी प्रमोद वाघ, पोउपनिरी विक्रम डुंबरे, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक प्रकाश मळेकर, पोशि. श्री. बाळकृष्ण खाडे, पोशि. श्री. संकेत सावंत, मपोशि श्रीमती जयश्री तलवारे, पोशि योगेश हिरेमठ, पोशि स्वप्निल जोगलपुरे, पोशि. रविंद्र देसले यांनी पुर्ण केलेली आहे.